**Maharashtra State Board of Secondary and Higher SecondaryEducation,**
**Kolhapur Divisional Board, Kolhapur-416004**
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६००४.**

Phones : Chairman 2690829 Secretary 2691405 PBX-2696101,2696102,2696103 FAX:[0231]2690758
E-Mail: divsec.kop@gmil.com Web : sscboardkolhapur.in

**अत्यंत महत्वाचे/परीक्षा प्राधान्य**

क्र.कोविमं/डीपी/ 109
दिनांक:-१० एप्रिल,२०२१.

प्रति,

सर्व परिरक्षक,
माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा,एप्रिल/मे-२०२१.
**(परिरक्षक वितरण केंद्र-सातारा/सांगली/कोल्हापूर)**

**विषय :- माध्यमिक शालांत/उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा एप्रिल-मे-२०२१ परीक्षेच्या केंद्राची व त्याअतंर्गत उपकेंद्राची माहिती केंद्रसंचालक यांना उपलब्ध करुन देणेबाबत...**

संदर्भ- दिनांक ०९.०४.२०२१ रोजी ई-मेल,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, एप्रिल-मे २०२१ च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (१२वी) परीक्षेसाठी केंद्रसंचालक यांची नियुक्ती आदेश व मुख्य केंद्रातंर्गत असलेल्या उपकेंद्रांची यादी दिनांक ०६.०४.२०२१ रोजी पोस्टाव्दारे पाठविण्यात आली आहे. तथापि, अदयापही सदर आदेश केंद्रसंचालकांना प्राप्त झाले नसल्याचे दिसून येत आहे. सदरची माहिती प्राप्त न झाल्याने केंद्रसंचालक यांना उपकेंद्रसंचालक नियुक्ती करणे अशक्य होते आहे.

तरी दिनांक ०९.०४.२०२१ रोजी ई-मेलव्दारे आपणांस पाठविण्यात आलेली केंद्र व केंद्रातंर्गत असलेल्या शाळा/कनिष्ठ महाविदयालयाच्या नावांची यादी आपल्या परिरक्षक केंद्राच्या अखत्यारित असलेल्या व मंडळाने नियुक्त केलेल्या केंद्रसंचालक यांना त्वरित उपलब्ध करुन दयावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरित मंडळास पाठवावा.

**देविदास कुलाळ**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**